शुक्रवार
दि.०८/०८/२०२५
दैनिक आर्वी टाईम्स, आर्वी

दैनिक
आर्वी टाईम्स
विदर्भ का एकमात्र प्रगतिशील हिंदी, मराठी समाचार पत्र
आर्वी

विदर्भ का एकमात्र प्रगतिशील हिंदी, मराठी समाचार पत्र

तनीष गजभिये ठरला विदर्भाचा स्मार्ट सिंगर

* यादे रफी फिल्म गीत गायन स्पर्धा * एम.ए. कादर यांचा हृद्य सत्कार

(प्रतिनिधी)

वर्धा : स्थानिक साहित्य कला शोधक मंचाच्या वतीने सलग २९ वर्षापासून आयोजित होणाऱ्या विदर्भास्तरीय यादे रफी फिल्म गीत गायन स्पर्धेचा विजेता नागपूर येथील तनीष गजभिये ठरला. द्वितीय क्रमांक छत्तीसगड येथील राकेश कुमार राम खिलवन बेरीहा तर तृतीय क्रमांक वाशिम येथील मंगल साहू याने प्राप्त केला. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत रंगलेल्या या स्पर्धेतील सदाबहार गीतांनी रसिक श्रोत्यांची मने जिंकली.

नागपूर येथील निष्ठावान कादर म्युझिक अकादमी व कादर ऑर्केस्ट्राचे संचालक तथा मोहम्मद रफी यांच्या आवाजात रसिकांना रिझविणारे कादर पटेल यांचा याप्रसंगी हृद्य सत्कार करण्यात आला. त्यांनी यावेळी गायलेल्या अजरामर गीतांनी सभा बांधला.अमरावती येथील जयश्री सुभेदार व तेलू येथील आमिर खान यांनी अनुक्रमे चौथा व पाचवा क्रमांक प्राप्त केला. या स्पर्धेतील विजेत्यांना २१ हजार, १५, १०, ७ आणि ५ हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे पहिल्या पाच पुरस्कारांचे स्वरूप होते यासोबतच १० स्पर्धकांना प्रत्येकी २१०१ रुपये व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. सभागात चांगले नहोदित गायक निर्माण व्हावे, यासाठी वर्धा येथील साहित्य कलाशोधक मंचाच्या वतीने गेल्या ३९ वर्षापासून या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.यावर्षीच्या स्पर्धेत विदर्भातील विविध जिल्ह्यातील ५५ नवोदित गायक गायिकांनी भाग घेतला. कार्यक्रमाला खासदार अमर काळे यांनी भेट देत स्पर्धकांचा उत्साह द्विगुणित केला. स्पर्धेचे उद्घाटन तिरुमल्ला तिरुपती मल्टीस्टेट सोसायटीचे विदर्भ प्रमुख अभय पुणेवार, एमटीडी ज्वेलर्सचे संचालक शीतल डोमणे यांच्या हस्ते झाले. बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक मोहन अग्रवाल होते प्रमुख पाहुणे म्हणून नागपूर येथील सुप्रसिद्ध उद्योगपती कमलेश उपकर, एम एमटीडी ज्वेलर्सचे संचालक अमोल डोमणे, ॲड. विजय बेदरकर, नागपूर येथील ज्येष्ठ पत्रकार नरेश डोंगरे, वर्धा श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण घोपटे, नागपूर येथील समाजसेवी संदीप पजई, प्रसिद्ध कवी संजय इंगळे तिगावकर, मंचाचे अध्यक्ष सुनील दुरांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन कार्याध्यक्ष प्रा. दिलीप मेने, प्रसिद्ध निवेदक असलम खान (सिंदी रेल्वे), किरण पट्टेवार यांनी केले.

कोषाध्यक्ष प्रशांत बबडे यांनी आभार मानले. स्पर्धेच्या आयोजनाकरिता उपाध्यक्ष गिरीश साबळकर, सचिव प्रभाकर उगेमुने, मोहन शेळके, अमर काळे, हरिष बनोजे, भानुदास सोमनाथे, पंकज ठाकूर, चंद्रकांत झगडर आणि मंचाच्या इतर सदस्य आणि सहकाऱ्यांनी सहकार्य केले.मान्यवरांचे आशीर्वादरुपी मार्गदर्शन खासदार अमर काळे यांनी तब्बल दोन तास गीतांचा आनंद घेतला त्यांनी स्पर्धकांना शुभेच्छा देताना गायकीचा रियाज, कष्ट, चिकाटी, जिद्द ठेवून मोठी उंची गाठा असे आवाहन केले. समाजसेवी मोहन अग्रवाल यांनी स्पर्धकांना शुभेच्छारूपी आशीर्वाद देत संस्थेच्या अनन्यसाधारण कार्याचे गीत सादर केले. यावेळी विविध मान्यवरांनी स्पर्धक व रसिकांशी संवाद साधला.

शेतकऱ्यांच्या सोयाबीनवर हुमणी अळीचा प्रहार

(प्रतिनिधी) (आकाजी): विरुळ सोयाबीनची पेरणी होऊन दीड महिन्याचा कालावधी लोटला आहे. परिसरात काही ठिकाणी जास्त तर काही ठिकाणी अतिशय कमी प्रमाणात पाऊस झाला आहे ज्या ठिकाणी पाऊस चांगला व पिकाच्या तकाचा झाला आहे. असा ठिकाणी पिकांची वाढ सुद्धा चांगली झाली आहे. तर काही ठिकाणी सोयाबीनची पाहिजे तशी वाढ झाली नसून त्यात आता सोयाबीनवर हुमणी अळीने आक्रमण केले असून शेतकऱ्यांपुढे एक नवीनच संकट निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांनी हुमणी अळीचे वेळीच व्यवस्थापन शेतकऱ्यांपुढे नवीन संकट येण्याची शक्यता ; वेळीच हुमणी अळीचे व्यवस्थापन करण्याचे कृषी विभागातर्फे आवाहनकरून उपाययोजना करण्याचा सल्ला कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना दिला आहे. याबाबत उपकृषी

अधिकारी दिनेश सबडे, कृषी सहायक दीपा शेळके, कृषी सहायक ओकार झालटे यांनी स्वतः शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन पाहणी केली व त्यावर योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी शेतकरी रामदास गाठे व शेतकरी उपस्थित होते, काही केल्या शेतकऱ्या मागची संकटाची मालिका संपत नसून आता परिसरातील शेतकऱ्यांपुढे हुमणी अळीने नवीन संकट निर्माण केले आहे. परिसरात सोयाबीन पिकावर हुमणी अळीचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव झाल्याने सोयाबीन उत्पन्नात घट येण्याची शक्यता निर्माण झाली असून शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. परिसरात यावर्षी पिकांच्या तकाचा समाधानकारक पाऊस पडत असल्याने शेतकऱ्यांची खरीप हंगामातील सोयाबीन कपाशी पिके चांगली बहरली आहे. मात्र सोयाबीन कपाशी पिके चांगल्या अवस्थेत असताना सोयाबीनवर हुमणी अळी तर कपाशीवर चक्री भुंग्याने आक्रमण केल्याने अवघ्या चाळीस ते पंचेचाळीस दिवसातच सोयाबीन व कपाशी पिकावर रोग व किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. हुमणी कीड ही बहुभक्षी कीड असून या किडीमुळे झाडांची पाने पिवळी पडून झाडे सुकतात अशी झाडे आढळल्यास झाडे उपटून मुळे कुरतडलेली आहे काते पाहावे व तसे आढळल्यास झाडाखाली दोन ते तीन इंच खोल क्लोरा कीटकनाशकांचे ड्रिंकिंग करावे त्यासोबतच हुमणी अळीच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांनी पिकामध्ये अंतर मशागत करावी व अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्या किंवा शक्य असल्यास पिकात पट पाणी द्यावे त्यामुळे अळ्या गुदमरून मरतात तरीच शेतातील तणाचा बंदोबस्त करावा अशा उपायोजना व व्यवस्थापना संदर्भात तालुका उपकृषी अधिकारी दिनेश सबडे यांनी सांगितले आहे, हुमणी अळीचा प्रादुर्भाव झाल्याने अळीची वाढ खुंटली असून झाडांची वाढ खुंटली आहे. पिकावर मर रोगाचे लक्षणेही आढळत आहे. परिणामी सोयाबीनचे उत्पन्न घटण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे परिस्तरात सोयाबीन व कपाशी हे शेतकऱ्यांचे मुख्य पीक असून गेल्या पाच सात वर्षापासून सोयाबीनला आराजी लागत नाही त्यात शर्वाची हुमणी अळीने घर घातली आहे. हुमणी अळीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढत असताना कृषी विभागाकडून हुमणी अळीच्या व्यवस्थापनासाठी काही उपाययोजना संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले आहे त्यानुसार शेतकऱ्यांनी हुमणी अळीचे व्यवस्थापन करावे, असे आवाहन उपकृषी अधिकारी व कृषी सहाय्यक यांनी शेतकऱ्यांना केले.

विद्या विकास महाविद्यालयात एचपीव्ही लसीकरण शिबिर

राष्ट्रीय सेवा योजना व स्वास्थ्य वृक्ष फाउंडेशनचा संयुक्त उपक्रम

(प्रतिनिधी)समुद्रपूर : स्थानिक विद्या विकास वाला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर येथे राष्ट्रीय सेवा योजना, हेल्थ चेकअप कमिटी आणि स्वास्थ्य वृक्ष फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एचपीव्ही (सर्व्हायकल कॅन्सर प्रतिबंधक) लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या उपप्राचार्य व विद्या विकास शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ. नयना शिरभाते होत्या. प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य प्रा. मेघश्याम ठाकरे, स्वास्थ्य वृक्ष फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष डॉ. दीपिका चांडोळे, संस्थापक

उपाध्यक्ष अभिषेक धावला, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रकाश तळे व डॉ. स्वाती येवतकर यांची उपस्थिती होती.डॉ. नयना शिरभाते यांनी विद्यार्थिनींना एचपीव्ही लसीचे महत्व समजावून सांगितले, तर डॉ. दीपिका चांडोळे यांनी लसीकरणामुळे भविष्यात होणाऱ्या फायदे आणि कॅन्सरपासून होणारे संरक्षण याबाबत माहिती दिली. डॉ. प्रकाश तळे यांनी विद्यार्थिनींना या लसीकरणाविषयी जागरूक केले, तरडॉ. स्वाती येवतकर यांनी विद्यार्थिनींमधील गैरसमज दूर करण्याचे कार्य केले, या शिबिराचा इतर शाळांतील विद्यार्थिनींनाही लाभ झाला. स्वास्थ्य वृक्ष फाउंडेशनच्या टीमने बहुसंख्य विद्यार्थिनींना लस देऊन यशस्वी लसीकरण केले.या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. महेश घिरडूणे, प्रा. पूर्वा शर्मारे, प्रा. वैशाली सुपारे, प्रा. इंदा डोबळे, तसेच राशेयोचे प्रा. मनोज बावणे, प्रा. राजकी कुमारे आणि रांजीव पवार यांनी सहकार्य केले.

राज्यातील नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी प्राधिकरण स्थापन करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : राज्यातील नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण (MSRRA) स्थापन करण्याची कार्यवाही सुरु करण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंजुरी दिली. राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करून त्यांचे पुनरुज्जीवन साध्य करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, नद्यांचे नैसर्गिक प्रवाह राखण्यासाठी आणि पुनरुज्जीवनासाठी हे प्राधिकरण विकासात्मक भूमिका बजावेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात यासंदर्भात बैठक झाली. या बैठकीला पर्यावरण आणि

हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अजिनी भिडे, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, वातावरणीय बदल कक्षाचे संचालक अभिजीत घोरपडे तसेच सल्लागार संस्थेच्या नमिता रेपे उपस्थित होत्या. प्राधिकरणाच्या रचना व संकल्पनेचे पर्यावरण मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी विस्तृत सादरीकरण केले. नदी पुनरुज्जीवनासाठी डीपीआर व खोरे व्यवस्थापन योजना मंजूर करणे, अतिक्रमण, वीज, भूसंपादन यासंबंधी अडचणी सोडवणे, राष्ट्रीय योजनांसाठी निवडक प्रकल्पांची शिफारस करणे इत्यादी महत्त्वपूर्ण कार्ये प्राधिकरणाद्वारे करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. प्राधिकरणाचे अध्यक्ष मुख्यमंत्री तर पर्यावरण मंत्री उपाध्यक्ष असणार आहेत. यासोबतच पर्यावरण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कार्यकारी समिती कार्यरत राहील. या राज्यस्तरीय समितीमध्ये तांत्रिक तज्ञ, वित्तीय व कायदेशीर सल्लागार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे (MPCB) सदस्य सचिव तसेच आयआयटीसारख्या प्रतिष्ठित संस्थांतील तज्ज्ञ सदस्य यांचा समावेश असेल. राज्यातील नद्यांचे शाश्वत पुनरुज्जीवन साध्य करण्यासाठी हे प्राधिकरण व्यापक काम करणार आहे. दैनंदिन कामकाजासाठी एमपीसीबीचे सदस्य सचिव प्रमुख असतील एक समर्पित सचिवालयही स्थापन करण्यात येणार आहे.

राज्यातील ५ ज्योतिर्लिंग विकास आराखड्यांच्या अंमलबजावणीसाठी वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांची नियुक्ती

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश; नियमितपणे आढावा, समन्वय साधणार

मुंबई : राज्यातील पाच ज्योतिर्लिंगांच्या विकास आराखड्यांची प्रभावी आणि वेगाने अंमलबजावणी व्हावी, यासाठी पाच वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. हे अधिकारी संबंधित ज्योतिर्लिंगांच्या विकास आराखड्यांतील कामांचा नियमितपणे आढावा घेऊन, त्याबाबतचा अहवाल मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांना सादर करतील. राज्यातील पाच ज्योतिर्लिंगांचा विकास करण्यासाठी आराखडे तयार करण्यात आले आहेत. या आराखड्यांची अंमलबजावणी वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने व्हावी या करिता या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ज्योतिर्लिंग व त्यांच्या विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त अधिकारी पुढीलप्रमाणे – श्री क्षेत्र भीमाशंकर (जि.पुणे) – सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती व्ही. राधा., श्री. क्षेत्र घृष्णेश्वर (जि. छत्रपती संभाजीनगर) – उद्य व तंत्र शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी. श्री. क्षेत्र त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) – वित्त विभागाचे प्रधान सचिव श्री. सौरभ विजय. श्री. क्षेत्र औंढा नागनाथ (जि. हिंगोली) – वित्त विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती रिचा बागला. श्री. क्षेत्र परळी वैजनाथ (जि. बीड) – इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव श्री. आप्पासाहेब धुळाज. या पाच ज्योतिर्लिंगांच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांना उच्चाधिकारी समित्यांच्या बैठकांमध्ये मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार वेळोवेळी शासन निर्णय देखील काढण्यात आले आहेत.

त्यानुसार श्री. क्षेत्र भीमाशंकर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील १४८ कोटी ३७ लाख रुपयांच्या सुमारे ११ कामांना मंजुरी देण्यात आली आहे. श्रीक्षेत्र घृष्णेश्वर तीर्थक्षेत्र विकास आराखडा १५६ कोटी ६३ लाख रुपयांचा आहे. श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर विकास आराखड्यातील २७५ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. श्री. क्षेत्र औंढा नागनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा ११ कोटी २१ लाख रुपयांचा आहे. तर श्री क्षेत्र परळी वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील २८६ कोटी ६८ लाख रुपयांच्या ९२ कामांना मंजुरी देण्यात आली आहे. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील विविध कामांना गती निळावी, ही कामे दर्जेदार आणि गतीने व्हावीत, यासाठी संबंधित अधिकारी समन्वय साधणार आहेत. अशा पद्धतीने विकास आराखड्यांच्या अंमलबजावणीसाठी मंत्रालयीन स्तरावरून समन्वय, संनियंत्रणासाठी अधिकारी नियुक्तीचा निर्णय पहिल्यांदाच घेण्यात आला आहे.

शाळांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्राधान्याने कार्यवाही करा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

जिल्हा नियोजन समित्यांना विविध यंत्रणांचा सहभाग घेण्याचे निर्देश

मुंबई : राज्यातील शालेय शिक्षण विभागांच्या सर्व शासकीय शाळांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याराठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे दिले आहेत. मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीनंतर शासकीय शाळांच्या दर्जोन्नतीबद्दल मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्यासोबत चर्चा करून समस्या जाणून घेतल्या. शाळांमधील पायाभूत सुधारणांबाबत मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले, राज्यातील शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. गुणवत्तेसोबतच शाळेत सुरक्षित, आरोग्यदायी आणि प्रसन्न वातावरण राहिल्यास शासकीय शाळेत पाल्याचा प्रवेश घेण्याचा पालकांचा कल वाढेल. त्यामुळे जिल्हा परिषद, म.न.पा, नगरपालिकांच्या शाळांमध्ये आवश्यकतेनुसार

पायाभूत सुविधांची उभारणी विविध संस्था आणि जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून करायी. यासाठी संबंधीत जिल्ह्याचे पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांनी प्राध्यान्याने अंमलबजावणीवर भर द्यावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले, शाळा इमारतींचे कुंपण, शुद्ध पिण्याचे पाणी (उज/णतणञ्ज सिस्टमसह), स्वच्छतागृह, शाळा इमारतींचे बांधकाम व जीर्ण इमारतींची दुरुस्ती, विद्यार्थिनींसाठी आरोग्यदायी सुविधायुक्त 'पिंक रूम', त्याचबरोबर जेईई व नीट (NEET) परीक्षेची पूर्वतयारी उपक्र माची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात यावी. ही विकासकामे जिल्हा नियोजन समिती (डीपीसी) व इतर शासकीय यंत्रणांच्या सहभागातून राबवण्यात यावीत. यामध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना, जिल्हा गौण खनिज प्रतिष्ठान निधी, जल जीवन मिशनच्या सहयोगातून अनेक सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी. तसेच या सुविधा उभारण्यासाठी जिल्हा नियोजन निधीतील शालेय शिक्षण व क्रीडा विभागासाठीचा आरक्षित निधी, महिला व बालविकास विभागाकडील आरक्षित निधी, नाविन्यपूर्ण उपक्र मांसाठीच्या निधीचे नियोजन प्रभावीपणे करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केल्या.

कार्यालय नगर परिषद, आर्वी, जिल्हा - वर्धा

क्र./मपआ/आ.वि/११०९/२०२५ दिनांक ०७/०८/२०२५

जाहिर सुचना

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ५ च्या कलम ३(१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार नगरपरिषद आर्वी द्वारे उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र नगरपरिषदा/नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या अन्वये नागरिकांना नगर परिषद आर्वी कडून पुरविण्यात येत असलेल्या ६९ लोकसेवा, नियत कालमर्यादा पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपील प्राधिकारी या बाबी नगर परिषद नोटीसबोर्डवर अधिसुचित करण्यात येत आहेत.

स्वा./-
मुख्याधिकारी,
नगर परिषद, आर्वी

दैनिक "आर्वी टाईम्स" आर्वी हे वर्तमान पत्र संपादक, प्रकाशक, मालक डॉ. प्रकाश मोतीलालजी राठी राठी ऑफसेट प्रिंटींग प्रेस विकास चौक आर्वी जिल्हा वर्धा (महाराष्ट्र) पिन कोड नं. ४४२२०१ येथे मुद्रीत करून कार्यालय दैनिक "आर्वी टाईम्स" शिवाजी चौक आर्वी जिल्हा वर्धा येथे प्रकाशित केले आहे. मुद्रक – डॉ. प्रकाश मोतीलालजी राठी, राठी ऑफसेट प्रिन्टर्स, आर्वी जि. वर्धा येथे मुद्रीत केले (९४२२१४३१७७) E-mail Address:arvitimes@rediffmail.com.

Scanned with OKEN Scanner